**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गो .ते .रूग्णालय इमारत संकुल,
१० वा मजला ,मंत्रालय ,मुंबई.०१

---

## जाहिरात

**सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची सेवा करार पद्धतीने विवक्षित कामांसाठी घेणेबाबत.**

सार्वजनिक आरोग्य विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई या कार्यालयामध्ये महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनस्तर एस-२३ व त्यावरील) व सामान्य राज्य सेवा, गट-अ (वेतनस्तर एस-२० व त्यावरील) मधील पदांची ज्येष्ठतासूची, बिंदुनामावली, सेवाप्रवेश नियम तयार करणे इ. विवक्षित कामांसाठी आरोग्य सेवा आयुक्तालयांतर्गत सामान्य राज्य सेवा, गट-अ अथवा गट-ब (राजपत्रित) या संवर्गातून सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी शासन निर्णय, सा.प्र.वि., क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ मधील अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी इच्छुक उमेदवारांनी अर्ज "अवर सचिव (सेवा-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, गो. ते. रुग्णालय इमारत संकुल, १० वा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ००१" यांच्याकडे सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांपर्यंत पोहचतील असे पाठवावेत. सदर कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर पदाचे कामाचे स्वरूप आणि करार पद्धतीने नियुक्तीच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहे.

**कामाचे स्वरुप:-**

१. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनस्तर एस-२३ व त्यावरील) व सामान्य राज्य सेवा, गट-अ (वेतनस्तर एस-२० व त्यावरील) मधील विविध पदांची ज्येष्ठतासूची तयार करणे व ती वेळोवेळी अद्यावत करणे.

२. जिल्हा शल्य चिकित्सक संवर्ग, जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्ग व विशेषज्ञ संवर्ग या पदांची सामाईक ज्येष्ठतासूची तयार करणे व ती वेळोवेळी अद्यावत करणे.

३. सदर संवर्गातील पदोन्नती कोट्यातील पदांची व नामनिर्देशन कोट्यातील पदांची बिंदुनामावली तयार करणे व ती वेळोवेळी अद्यावत करणे.

४. सदर संवर्गातील पदांचे सेवा प्रवेश नियम अद्यावत करणेबाबत कार्यवाही करणे.

५. सदर संवर्गातील पदांचे पदनिर्मितीच्या शासन निर्णय एकत्रित करून, पदांची संख्या निश्चित करून अहवाल सादर करणे.

करार पध्दतीने नियुक्तीच्या अटी व शर्ती :-

१. उपरोक्त पदासाठी इच्छुक उमेदवार हा आरोग्य सेवा आयुक्तालयांतर्गत सामान्य राज्य सेवा, गट-अ अथवा गट-ब (राजपत्रित) या संवर्गातून सेवानिवृत्त झालेला असावा.

२. उमेदवाराला सेवाविषयक बाबीसंबंधातील (ज्येष्ठतासूची, बिंदुनामावली, सेवाप्रवेश नियम तयार करणे इ.) सखोल ज्ञान व कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव असावा.

३. उमेदवाराचे वय दि.०१.१२.२०२३ रोजी ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४. उमेदवार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

५. उमदेवाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा असा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

६. नियुक्तीच्या कालावधीत सोपविलेले विवक्षित काम पूर्ण करण्याचे बंधपत्र/हमीपत्र उमदेवाराला देणे बंधनकारक राहील.

७. उमेदवाराला शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.१७.१२.२०१६ मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्तीचे पालन करुन, त्याच्या सेवानिवृत्ती वेतनाच्या आधारे मासिक परिश्रमिक रक्कम निश्चित करण्यात येईल.

८. उपरोक्त उमेदवाराची करार पद्धतीने नियुक्ती ०१ वर्षासाठी राहील. तथापि, आवश्यकता भासल्यास नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत विचार केला जाईल.

९. उमेदवाराला शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दि.१७.१२.२०१६ मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्ती लागू राहतील.

१०. करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाहीत.

११. उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन / नियुक्ती अधिकारी वेळोवेळी ठरवतील त्या अटी व शर्ती अंतिम राहतील.

दिनांक : २४/११/२०२३
ठिकाण: मंत्रालय, मुंबई.

(व.पां.गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
गो .ते .रूग्णालय इमारत संकुल,
१०वा मजला ,मंत्रालय ,मुंबई.०१

दिनांक २४.११.२०२३

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, या कार्यालयाकडून सादर करण्यांत आलेली जाहिरात - "सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांची सेवा करार पद्धतीने विवक्षित कामांसाठी घेणेबाबत" प्रकाशित करण्याकरीता होणाऱ्या खर्चाची तरतुद शासकीय संदेश प्रसार नियमावली २०१८, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मावज २०१८/प्र.क्र.३४८/३४ दिनांक २० डिसेंबर २०१८ अन्वये करण्यात आलेली आहे.

(व. पां. गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन